<u>नियमित दिवाणी दावा क्र.३१९/२०१६</u>
<u>श्री. प्रभु नरसिंघाणी विरुध्द भगवानदास नरसिंनी तर्फे वारस</u>
**निशाणी क्र.४८ वरुन**

**उलटतपास प्रतिवादी क्र.१अ ते १क चे विधिज्ञ श्री. संजय भोजवानी यांचे मार्फत**

१६. दावा मिळकत ही वडिलोपार्जित आहे हे दाखवणारे दस्त ऐवज मी प्रकरणात दाखल केले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ५३ वर मी माझी आई हिचे नावे असलेली शॉप अक्ट लायसेन्स व सिटी सर्वे अधिकारी यांच्याकडे घेतलेला हरकत अर्जची प्रत सादर केलेली आहे.

प्रश्न – निशाणी ५३ वरील दस्त हे दावा मिळकत तुमची वडिलोपार्जित आहे हे दर्शविणारे दस्त नाहीत ?

उत्तर – त्याबाबत मला माहिती नाही. ती माहिती माझे मुलाला आहे.

१७. हे म्हणणे खरे आहे की, आईच्या नावे असलेले शॉप अक्ट लायसेन्स आम्ही रेन्यु केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई आजरोजी हयात नाही. मला माझे आईचे मृत्यु दिनांक याक्षणी आठवत नाही. मी आईचे नावे दाखल केलेले शॉप अक्ट लायसेन्सवरती पत्त्यामध्ये सर्वे नं.१३, प्लॉट नं. नमुद नसुन रिव्हर रोड आदर्शनगर, पुणे असा पत्ता नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१७ ते आजतागायतपर्यंत आईचे नावे असलेल्या शॉप अक्ट लायसेन्स व्यतिरिक्त आमच्याकडे कोणतेही शॉप अक्ट लायसेन्स नाही. माझे भाउ प्रेम नरसिंगानीचे नावे शॉप अक्ट लायसेन्स असलेबाबत मी सरतपासादरम्यान सांगितले, परंतु त्या संदर्भातील दस्त मी न्यायालयात दाखल केलेले नाही. माझा दुसरा भाउ नामे चंदुमल नरसिंगानीचे नाव किराणा दुकानाचे लायसेन्स आहे ही बाब मी सरतपासात सांगितली परंतु त्या संदर्भातील दस्त ऐवज मी प्रकरणात दाखल केले नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, दोन्ही लायसेन्स माझ्या भावाकडे असल्यामुळे ते लायसेन्स प्रकरणात दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे दोन्ही भावाकडे असे कोणतेही लायसेन्स नसल्यामुळे ते मी प्रकरणात दाखल केलेले नाही.

प्रश्न – तुम्ही प्रेम नरसिंगानी व चंदुमल नरसिंगानी यांचे नावे असलेले लायसेन्स प्रकरणात दाखल करु शकता काय ?

उत्तर – होय. मी ते पुढील तारखेस दाखल करु शकतो.

१८. दावा मिळकतीवर असलेलया १५०० चौ.फुट जागेवर गोठया संदर्भातील मालकी दस्त मी प्रकरणात दाखल करतो असे म्हणालो होतो परंतु ते माझे जवळ आहेत किंवा नाहीत हे मला पाहावे लागेल. मी निशाणी ५३ खाली सिटी सर्वे अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४/०७/२०१६ या दिवशी आक्षेप अर्ज दाखल केला त्याची प्रत प्रकरणात दाखल केलेली आहे. त्या अर्जावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ५४** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ५४ वरील आक्षेप अर्जावर माझा भाउ नामे चंदुमल मुलचंद नरसिंगानी, प्रेम मुलचंद नरसिंगानी, माझी बहीण माया परमानंद इसरानी, मंजु दौलतराम छापरु यांच्या देखील सहया आहेत. दिनांक १०/०२/२०१७ रोजी सिटी सर्वे ऑफीसर यांच्या आदेशाबाबत मला माहिती नाही.

१९. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे दाव्यात व शपथपत्रामध्ये प्रतिवादी क्र.१अ ते १क दावा मिळकत विकण्याचा प्रयत्न करत असल्याबाबत मजकुर नमुद केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्यात व माझे शपथपत्रामध्ये प्रतिवादी क्र.१अ ते १क दावा मिळकत विक्री करत असल्याचा प्रयत्न करत आहेत हे मी खोटे सांगितले आहे. प्रतिवादी क्र.१ अ ते १क हे दावा मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात असलेबाबत आमच्याकडे पुरावा आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१अ ते १क यांना दावा मिळकतीची विल्हेवाट, उपभोग घेणे याबाबतचा संपूर्ण अधिकार आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीवर प्रतिवादी क्र.१ अ ते १ क यांचे नाव होते व आहे ही बाब मला पूर्वी माहिती होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्रातील परिच्छेद क्र.६ मधील मजकुर मी खोटा नमुद केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा मयत भाउ भगवानदास याचे नाव भगवानदास मुलचंद केसवानी असे होते ते त्याने भगवानदास मुलचंद नरसिंगानी असे गॅझेटमधुन करुन घेतले होते.

२०. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ अ ते १क हे दावा मिळकतीतील ३०० ते ३५० फुट एवढया क्षेत्रावर राहत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रेम मुलचंद नरसिंगानी यांनी माझा भाउ भगवानदास हा हयात असतानाच दुसरीकडे गावठाण केले होते. साक्षीदार स्वतःहुन विचार करुन प्रेमचंद दुसरीकडे गेला नव्हता आम्ही एकत्रच राहत होतो असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, प्रेम नरसिंगानी दुसरीकडे गावठाण करण्यास गेला असता केवळ भगवानदास हाच दावा मिळकतीमध्ये दुधाचा व्यवसाय करत होता. हे म्हणणे खरे नाही की, भगवानदास मयत झाला त्यावेळी त्याच्याकडे असलेला गोठा व त्यातील जनावरे याबाबतचा पूर्ण खर्च त्याचाच होता. हे म्हणणे खरे नाही की, दुध व्यवसायातील आलेले आर्थिक उत्पन्न केवळ मी माझेकडे ठेवतो. हे म्हणणे खरे आहे की, दुधाच्या व्यवसायातुन आलेले आर्थिक उत्पन्न मी, चंदुमल नरसिंगानी व प्रेम

**निशाणी क्र.४८ वरुन**

नरसिंगानी वाटुन घेतो. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचे लाईट बील भगवानदास नरसिंगानी यांचे नावे येते. साक्षीदार सांगतो की, परंतु ते लाईट बील आम्ही सर्वजण भरतो. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीवर मी गाईचा गोठा चालवितो तो बंद कराणेकामी महानगरपालिकेकडुन मला नोटीस मिळाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीतील १५०० चौ.फुट ही जागा मी भाडयाने देतो. हे म्हणणे खरे नाही की, मी माझा भाउ चंदुमल व प्रेम आम्ही तिघांनी मिळुन दावा मिळकत हडप करणेकामी प्रतिवादी क्र.१ अ ते १ क यांचे विरुध्द हे खोटे प्रकरण दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी अडाणी असल्यामुळे व दाव्यामध्ये व पुराव्याचे शपथपत्रामध्ये काय नमुद केले आहे हे मला माहिती नाही.

**साक्षीदार दावा मिळकत वडिलोपार्जित असलेबाबत तसेच भावाचे नावे असलेले शॉप अक्ट लायसेन्स व दावा मिळकतीतील १५०० चौ.फुट गावठाण या जागेवर त्याची मालकी असलेबाबत दस्त पुढील तारखेपर्यंत दाखल करणार असे सांगितल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

SATYVATI SHARADCHANDRA CHAVAN
Digitally signed by SATYVATI SHARADCHANDRA CHAVAN
Date: 2025.11.12 17:04:48 +0530

(एस.एस.चव्हाण)
दिवाणी न्यायाधिश क.स्तर,
पिंपरी, जि. पुणे

पिंपरी, पुणे
दिनांक :-१२/११/२०२५